# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 13/02/2024 (मंगळवार) सकाळ


## पो.स्टे. बोरी हद्दीमधील खरसोली गावाचे नाल्याचे काठयावर जुगार अड्डयावर धाड
## —: नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक १२/०२/२०२४ रोजी पोलीस स्टेशन बोरी येथील स्टाफ अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना पोलीस स्टेशन बोरी येथील खरसोली गावाचे नाल्याचे काठावर काही इसम अवैध जुगार खेळत असल्याची गोपनिय माहीती पोलीस स्टेशन बोरी येथील स्टाफला प्राप्त झाले वरून सदर स्टाफ यांनी खरसोली येथे जावुन पाहणी केली असता त्या ठिकाणी लोकांची गर्दी दिसली. तेथे पोलीसांना पाहुन काही लोक पळु लागले. त्यांना स्टाफच्या मदतीने पकडण्यात आले. सदर ठिकाणी सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे—१) गोपाल पुरन रॉय, वय १९ वर्ष, रा. प्लॉट नं. २९ हनुमान मंदीरजवळ बेसा नागपुर २) प्रदीप मेश्राम, वय २७ वर्ष, रा. न्यु कैलास नगर डॉक्टर किनकर हॉस्पीटल मागे मानेवाडा नागपुर ३) नितेश कुंदनसींग शेगर वय ४३ वर्ष, रा. नरसाळा रोड नागपूर ४) सुनिल दादुजी बिसेन, वय २९ वर्ष, रा. रेणुकामाता मंदीर जवळ हुडकेश्वर नागपूर ५) दिपक सुरेश ग्लॉलवंशी वय २१ वर्ष, रा. खरसोली नागपुर ६) चंद्रशेखर अशोक शाहु, वय २४ वर्ष, रा. रेणुकामाता मंदीर जवळ हुडकेश्वर नागपुर ७) सुधाकर दयाराम मेश्राम वय ५० वर्ष, रा. महानंदा सोसायटी नरसाळा नागपुर ८) सतिश चरनदास तायडे, वय ३७ वर्ष, रा. म्हडगीर नगर गजानन मंदीर नागपुर** हे पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळतांनी मिळुन आले. एकुण ०८ जुगारी इसम यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन नगदी पैसे एकुण १०,०३०/— रू. एकुण मोबाईल तीन किंमती ८५००/—रू. एकुण मोटार सायकल दोन किंमती १,१०,०००/— रू. ५२ तासपत्ते किंमती ०० रू असा एकुण १,२८,५३०/— रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपीतांविरूध्द पोलीस ठाणे बोरी येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवुन नमुद आरोपीतांना सुचनापत्रावर सोडण्यात आले.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोस्टे बोरी येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक हदयनारायण यादव, सहायक पोलीस निरीक्षक सतिश मेश्राम, पोलीस उपनिरीक्षक जगदीश पालीवाल, पोलीस अंमलदार पांडुरंग मुंडे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

## गोवंशाची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई
## एकुण ७,५०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त
## नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दिनांक १२/०२/२०२४ रोजी पोलीस स्टेशन मौदा येथील पोलीस स्टाफ पो.स्टे. मौदा हद्दीत पेट्रोलिंग करीत असता गोपनीय माहिती मिळाली की, मौजा सेलु ते परसाड शिवार येथे बोलेरो पिकअप क्र. एम.एच—४०/ए.टी.—६८१७ ने काही इसम अवैधरित्या गोवंश कत्तली करीता घेऊन जात आहे. अशा मिळालेल्या खबरेवरून दिनांक १२/०२/२०२४ रोजी पोलीस स्टेशन मौदा येथील स्टाफ यांनी मौजा सेलु ते परसाड शिवार येथे नाकाबंदी करून बोलेरो पिकअप क्र. एम. एच—४०/ए.टी.—६८१७ ची पाहणी केली असता आरोपी बोलेरो पिकअप क्र. एम. एच—४०—ए.टी.—६८१७ चा चालक हा आपले वाहनामध्ये एकुण १५ गोवंश यांना चारा पाण्याची सोय न करता क्रुरतेने बांधुन अवैध्य वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपीच्या ताब्यातून एकुण १५ गोवंश जनावरे प्रत्येकी

१०,०००/–रु प्रमाणे १,५०,०००/–रु. व बोलेरो पिकअप क्र. एम. एच–४०/ए.टी.–६८१७ किंमती ६,००,०००/– रु असा एकुण ७,५०,०००/– रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीविरूद्ध पोलिस स्टेशन मौदा येथे कलम ११(१), ११(१)(D), ११(१)(I), ११(१) (F) प्राणि निर्दयतेने वागविणे कायदा सहकलम ५(१),(२),९ महा. पशु संर.अधि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास पोस्टे मौदा करीत आहेत. १५ जनावरांना संरक्षणाकरीता गोरक्षण भंडारा येथे दाखल करण्यात आले.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोस्टे मौदा येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक सतिशसिंग राजपूत सफौ. नामदेव पुजारी, नापोशि दीपक दारोडे, अतुल निंबार्ते, पोहवा भगवान चांदेवार, नापोशि डोईफोडे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर